# Garware Polyester Ltd.

GARWARE HOUSE, 50 - A, SWAMI NITYANAND MARG,
VILE PARLE (EAST), MUMBAI-400 057.
TEL.: 91-22-6698 8000 ( 15 Lines ) FAX: 2824 8155 / 66

**19.04.2021**

BSE Limited
Corporate Relationship Management,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400001.

Scrip Code: 500655

**Sub.: Newspaper Publication - Compliance under Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

**Ref.: SEBI Circular No. SEBI/HO/MIRSD/DOS3/CIR/P/2018/139 dated 06th November, 2019**

In compliance with the aforesaid circular, the Company has issued newspaper advertisement for giving notice of proposed transfer of shares in the following newspapers;

1. The Free Press Journal (Mumbai Edition _ English)
2. Navshakti (Mumbai Edition _ Marathi)
3. Sanjay Warta (Aurangabad Edition _ Marathi)

The scanned copies of the advertisement are enclosed herewith.

Thanking you,

Yours faithfully,

For **Garware Polyester Limited**

Awaneesh Srivastava
**Company Secretary**

THE FREE PRESS JOURNAL

www.freepressjournal.in MUMBAI | MONDAY | APRIL 19, 2021

GARWARE

**GARWARE POLYESTER LIMITED**

**CIN:** L10889MH1957PLC010889
**Regd. Office:** Naigaon, Post Waluj, Aurangabad - 431 133.
**Corporate Office Tel:** +91-22-6698 8000, **Fax:** +91-22-2824 8155.
**E-mail:** cs@garwarepoly.com, **Website:** www.garwarepoly.com

## NOTICE

Notice is hereby given that the following persons/ transferees had lodged the Transfer Deed(s) on 19.02.2019 and re-lodged the same before 31.03.2021 along with share certificate(s) for Transfer of shares with old Transfer Deed (Form 7B) as per list mentioned below.

| Name of Transferor | Folio No. | Distinctive No's | | Certificate No's | No. of shares | Name of the Transferee |
|---|---|---|---|---|---|---|
| | | From | To | | | |
| Prahaladbhai K Patel | 00P03162 | 4537876 | 4537925 | 51754 | 50 | Jayantilal Khodidas Patel jointly Dilipkumar Khodidas Patel |
| Jashumatiben G Patel | 00J02489 | 3537576 | 3537625 | 28258 | 50 | Jayantilal Khodidas Patel jointly Dilipkumar Khodidas Patel |
| Gandalal Parasottamdas Patel | 00G01619 | 3225026 | 3225075 | 20831 | 50 | Jayantilal Khodidas Patel jointly Dilipkumar Khodidas Patel |

As per the SEBI circular dated 6th November 2018, clause 2 (c) allows transfer of physical shares in case of major mismatch / non-availability of transferor's signatures, subject to procedural requirements to be complied. The Company will process transer of the aforesaid shares only in demat form, in case the Company/ its Registrar and Transfer Agent (RTA) – M/s Link Intime India Private Limited, C 101, 247 Park, L.B.S. Marg, Vikhroli (West), Mumbai – 400083 do not receive any objection/s for the same within 30 days from the date of publication hereof.

For, **Garware Polyester Limited**
Sd/-
Awaneesh Srivastava
Company Secretary

**Date:** 19th April, 2021
**Place:** Mumbai

नव शक्ति | मुंबई, सोमवार, १९ एप्रिल २०२१

GARWARE

## गरवारे पॉलीएस्टर लिमिटेड

CIN: L10889MH1957PLC010889
नोंदणीकृत कार्यालय: नायगाव, पोस्ट वाळुज, औरंगाबाद – 431 133.
कॉर्पोरेट कार्यालय दूरध्वनी: +91 22 6698 8000, फॅक्स: +91 22 2824 8155.
ई-मेल: cs@garwarepoly.com, वेबसाइट: www.garwarepoly.com

### सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की पुढील व्यक्तींनी / हस्तांतरितींनी हस्तांतरण विलेख 19.02.2019 रोजी दाखल केले होते आणि त्यांचाच पुर्णदाखला 31.03.2021 पूर्वी भाग प्रमाणपत्रा(त्रां)सहित जुन्या हस्तांतरण विलेखासोबत (फॉर्म 7बी) भाग हस्तांतरणासाठी निम्नोल्लेखित यादीनुसार केला होता.

| हस्तांतरकाचे नाव | फोलिओ क्र. | व्यवच्छेदी क्रमांक | | प्रमाणपत्र क्रमांक | भागांची संख्या | हस्तांतरितीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | | |
| प्रह्लादभाई के पटेल | 00P03162 | 4537876 | 4537925 | 51754 | 50 | जयंतीलाल खोदीदास पटेल आणि दिलीपकुमार खोदीदास पटेल संयुक्तपणे |
| जशुमतीबेन जी पटेल | 00J02489 | 3537576 | 3537625 | 28258 | 50 | जयंतीलाल खोदीदास पटेल आणि दिलीपकुमार खोदीदास पटेल संयुक्तपणे |
| गांडालाल परसोत्तमदास पटेल | 00G01619 | 3225026 | 3225075 | 20831 | 50 | जयंतीलाल खोदीदास पटेल आणि दिलीपकुमार खोदीदास पटेल संयुक्तपणे |

6 नोव्हेंबर 2018 रोजी दिनांकित सेबी परिपत्रकानुसार, खंड 2 (क) अन्वये प्रक्रियेच्या आवश्यकतांचे अनुपालन केल्यास मोठी विजोडता / हस्तांतरकाच्या स्वाक्षऱ्या अनुपलब्ध असताना भौतिक भागांचे हस्तांतरण करता येते. कंपनीला / तिच्या निबंधकाला आणि हस्तांतरण एजंट (आरटीए) मे. लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी 101, 247 पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – 400083 यांना याबद्दल या प्रकाशनाच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत कोणतीही हरकत मिळाली नाही तर कंपनी उपरोक्त भागांचे हस्तांतरण केवळ डीमॅट स्वरूपात करेल.

**गरवारे पॉलीएस्टर लिमिटेड साठी**
सही /-
अवनीश श्रीवास्तव
कंपनी सचिव

**दिनांक :** 19 एप्रिल 2021
**स्थळ :** मुंबई

नवज्योत हॉस्पिटल
उपलब्ध उपचार: ❋ह्दयरोग, उच्चरक्तदाब, दमा व छाती दुखणे, लिवर/ किडणीचे आजार ❋ मधुमेह, शुगर/डायबेटीज थायराइड, अंगावर सुज येणेचे आजार ❋ त्वचारोग/हडीताप/ साधींवात /चरबीचे आजार, अर्धांगवायू, झटके येणे.
उपलब्ध सुविधा: ❋मेडिकल सर्टिफिकेट/ सर्जीकल फिटनेस ॲलर्ट वर्कमीनेसन ❋ अल्प दरात साखर व ईसीजी तपासणी ❋ स्वस्त औषधालय ❋ २४ तास रक्त तपासणी घरपोच सेवा ❋ तपासणी वेळ : सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत सायंकाळी ५.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत.
डॉ. भारती चांडक (स्त्री चिकित्सक) (MBBS MD)
डॉ. घनशाम चांडक (MBBS DMB Med (HYD.)) ह्दयरोग/मधुमेह/ थायराइड, मुत्रपींड तज्ञ. मो. ७८८७७१४६६०
प्रथमेशनगर, देवळाई, औरंगाबाद.



# संजयवार्ता



अजिंठा बँक
आता कर्जावरील व्याज अजून कमी
◆ मुदत कर्ज: १६%
◆ कॅश क्रेडीट कर्ज: १५.५०%
◆ ओ.डी.ए.पी.आर.कर्ज: १६.५०%
◆ सोने तारण कर्ज: १४%
◆ गृह कर्ज: १३.५०%
जाधवमंडी: 0240-23653011/12
उस्मानपुरा: 0240-23653018/19
Website : www.ajanthabank.com
E-mail : ceo@ ajanthabank.com



सोमवार, दि. १९ एप्रिल २०२१
औरंगाबाद ❖ वर्ष २४, अंक २५५ ❖ ❖ पृष्ठे ४ ❖ किंमत ₹ एक (www.sanjaywarta.com) ❖ संपादक : शिवनाथ राठी ❖कार्यकारी संपादक – रामेश्वर राठी ❖ सहाय्यक संपादक – सचिन राठी
e-पेपरसाठी लॉगऑन करा epaper.sanjaywarta.com


# जगभरात लसीचा तुटवडा

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**

जगभरात कोरोना लसीचा तुटवडा भासू लागलाय. लसीच्या वितरणासाठी सुरू करण्यात आलेल्या कोव्हॅक्स कार्यक्रमात अडथळा येत आहे. त्यामुळे जगातील सर्वात गरीब देशांसह किमान ६० देशांतील लसीकरणाला फटका बसू शकतो. युनिसेफच्या आकडेवारीनुसार गेल्या दोन आठवड्यांत ९२ विकसनशील देशांच्या लस पुरवठ्यासाठी २० लाखांहून कमी कोव्हॅक्स लसींना मंजुरी देण्यात आली आहे. ब्रिटन मध्ये एवढ्याच लसींचा पुरवठा करण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) महासंचालक टेड्रस अधानम घेब्रेयेस यांनी लसींच्या जागतिक वितरणातील असंतुलनाबद्दल टीका केली आहे. श्रीमंत देशांत सरासरी चारपैकी एका व्यक्तीला कोविड-१९ लस देण्यात आली आहे.



कमी उत्पन्न असलेल्या देशांत ५०० लोकांपैकी सरासरी एका व्यक्तीला लस देण्यात आली आहे. लसींचे वितरण करणारी संघटना गावीनुसार पुरवठ्यातील विलंबामुळे ६० देशांचे नुकसान होऊ शकते. पुरवठ्यातील अनिश्चिततेमुळे काही देशांचा कोवॅक्सवरील विश्वास कमी झाला आहे, असेही दिसून आले आहे. म्हणूनच आता चीन व रशियाच्या लसींच्या वापराला हिरवा कंदील दाखवण्यासाठी आरोग्य संघटनेवर दबाव वाढू लागला आहे. जगभरातील सर्व लसींचे वितरण लोकसंख्येच्या निकषावर करण्यात आल्यास वास्तविकतेपेक्षा अमेरिका सहापट जास्त डोस घेईल. ब्रिटनही लोकसंख्येच्या तुलनेत सातपट जास्त लसीचा वापर करेल. संयुक्त अरब अमिराती व इस्रायल क्रमश: नऊ व बारा टक्के लसीकरण करतील. उच्च उत्पन्न गटातील देशांत कमी उत्पन्न असलेल्या देशांच्या तुलनेत २५ पट वेगाने लसीकरण राबवले जात आहे.

## भाजीपाला उत्पादकांना कोरोनाचा बसला फटका

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील आठवडी बाजार बंद झाल्यामुळे त्याचा फटका शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याला बसत आहे. अनेक शेतकऱ्यांवर भाजीपाला शेतातच सोडून देण्याची वेळ आली आहे. अगोदरच भाजीपाला पिकातून शेतकऱ्यांचा खर्चही वसूल झालेला नाही. त्यातच कोरोनामुळे अनेक आठवडे बाजार बंद आहेत. त्याचा फटका भाजीपाल्याला बसत आहे. कायगाव, टाकळी जिवरग, निल्लोड, गव्हाली, तलवाड्यातील शेतकऱ्यांनी भाजीपाल्याला पसंती दिली. परंतु त्याचेही उत्पादन जास्त झाल्याने कमी भावाने विक्री करावे लागत आहे. फटका भाजीपाल्याला बसत आहे. कायगाव, टाकळी जिवरग, निल्लोड, गव्हाली, तलवाड्यातील शेतकऱ्यांनी भाजीपाल्याला पसंती दिली. परंतु त्याचेही उत्पादन जास्त झाल्याने कमी भावाने विक्री करावे लागत आहे.

# उन्हाळी खाद्यपदार्थ बनवण्याच्या कामात गुंतल्या ग्रामीण महिला



**औरंगाबाद/प्रतिनिधी**

उन्हाच्या झळा जाणवू लागल्या की, ग्रामीण भागात महिलांची वाळवणाचे पदार्थ तयार करण्यासाठी लागबग सुरू होते. सध्या गावागावातून महिलांनी या कामाला गती दिली असून, ठिकठिकाणी वाळवणाच्या कामात व्यस्त दिसून येत आहेत. रब्बी हंगाम संपला की, महिला कुरड्या, खारोड्या, पापड, सांडाया, शेवाया, वडा, आदी वाळवणीचे पदार्थ बनविण्यास प्रारंभ करतात. उन्हाळ्यात बनविलेले हे पदार्थ नंतर वर्षभर जेवणासोबत चव वाढविण्यासाठी उपयोगात आणले जातात. शिवाय आमरसाच्या पंगतीत खास करून या पदार्थांचा वापर केला जातो. सध्या औरंगाबाद जिल्ह्यात भल्या सकाळी उठून महिला वाळवणीचे पदार्थ बनविताना दिसत आहे. यासाठी शेजारच्या महिला एकमेकींच्या मदतीला धावून येत असतात. ज्यांच्या घरी लग्नकार्य आहे. त्यांना तर रुखवतासाठी असे पदार्थ मोठ्या प्रमाणात तयार करावे लागतात. हे पदार्थ बनविताना महिलांना मोठे कष्ट उचलावे लागत असलेतरी या पदार्थांचा आस्वाद घेतल्यानंतर कुटुंबाला जे समाधान मिळते, त्यातच महिलांच्या कष्टाचे सार्थक सामावलेले असते. पारंपरिक पदाथार्सोबत सध्या आलू ( बटाटा ) चिप्स, साबुदाणा चकल्या, तांदळाचे मुरकुल, साबुदाणा पापड आदी आधुनिक पदार्थ बनविण्यासाठी क्रेझ शहरी महिलांमध्ये जास्त दिसून येत आहे. आताच्या लहान बालकांची रुचीही या नवीन पदार्थांकडे जास्त असल्याने, आता ग्रामीण भागातही महिला हे पदार्थ बनविण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत.

# नांदेड-पनवेल विशेष रेल्वे रद्द केल्याने नाराजीचा सूर

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

सोलापूर विभाग मध्ये रेल्वेमधील भाळवणी ते भिगवण या रेल्वेस्थानका दरम्यान, दुहेरीकरणाच्या कामासाठी ३१ मेपर्यंत नांदेड-पनवेल-नांदेड ही विशेष रेल्वे (०७६१३/१४) रद्द केली आहे. यामुळे प्रवाशांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. ही गाडी मनमाडमार्गे वळवण्यात यावी, जेणे करून प्रवाशांची होणारी हेळसांड थांबेल, असे प्रवाशांचे म्हणणे आहे. नांदेड-पनवेल-नांदेड ही विशेष रेल्वे मनमाडमार्गे आठवड्यातून चार दिवस चालवली होती.

त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. दरम्यान, एक एप्रिलपासून पुन्हा परळी मार्गे सुरू होत असल्यामुळे मनमाडमार्गे बंद केली. मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या वतीने दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक गजानन माल्या यांना मोबाइलवर संपर्क साधून मनमाड -दौंडमार्गे नांदेड-पनवेल विशेष रेल्वे चालवण्याची मागणी केल्याचे संघटनेचे अध्यक्ष अरुण मेघराज म्हणाले.

## लष्करावर टीका केल्यास कैद ; पाकच्या समितीचे समर्थन

**इस्लामाबाद/**

पाकिस्तानातील शक्तीशाली लष्करावर कोणी टीका-टिप्पणी केल्यास दोषीला दोन वर्षांची कैद व ५० हजार रुपये किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते. यासंबंधीच्या प्रस्तावाला पाकिस्तानच्या संसदीय समितीने पाठिंबा दिला आहे. नॅशनल असेंब्लीच्या स्थायी समितीने या प्रस्तावाला आधीच पारित केले आहे.

या निर्णयावर विरोधी पक्षाने इम्रान सरकारवर टीका केली आहे. हा प्रस्ताव देशाच्या मुलभूत हक्कावर गदा आणण्याचा प्रकार आहे, अशी टीका विरोधी पक्षाने केले आहे. आता सरकार त्याची अंमलबजावणी करते का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# शासन दुग्ध उत्पादकांच्या खंबीरपणे पाठिशी – दुग्ध विकास मंत्री सुनील केदार

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा विकास हाच शासनाचा केंद्रबिंदू आहे. त्याचबरोबर राज्यातील कष्टकरी दुग्ध उत्पादकांच्या पाठिशी शासन खंबीरपणे आहे. मागील वर्षाच्या मार्च महिन्यात लॉकडाऊनमुळे अधिक दुधाचा प्रश्न भेडसावू नये, यासाठी शासनाने दुग्ध संकलन सहकार क्षेत्रातूनच केले. सहकार क्षेत्राला यातून मदतच झाली, असे प्रतिपादन दुग्ध विकास, पशुसंवर्धन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी केले.

गांधेली येथील जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या दुग्धशाळा पाहणी दरम्यान श्री. केदार बोलत होते. यावेळी उत्पादक संघाचे अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे, आम दार संजय शिरसाट, माजी आम दार कल्याण काळे आदींसह उत्पादक संघाचे उपाध्यक्ष नंदलाल काळे, संचालक




कचरू डिके, राजेंद्र जैस्वाल, गोकुळसिंग राजपूत, राजेंद्र पाथ्रीकर, पुंडलिकराव काजे, दिलीप निरपळ, व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.बी.पाटील आदींची उपस्थिती होती.

मंत्री केदार म्हणाले, बाहेर राज्यातील काही दूध संस्थांनी राज्यातील दुधाची बाजारपेठ काबीज केली आहे. यावर सर्व लोकप्रतिनिधींनी चिंतन करण्याची आवश्यकता आहे. सध्याचा काळ कोरोना विषाणूच्या प्रसारामुळे संकटकाळ आहे. या काळात सर्वांनी शासनाच्या सर्व सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, असे मतही श्री. केदार यांनी व्यक्त केले.

सुरूवातीला श्री. केदार यांनी उत्पादक संघाच्या दुग्ध शाळेतील दुधापासून निर्मित विविध पदार्थांची पाहणी करून उत्पादन प्रक्रिया समजून घेतली. यामध्ये दुग्ध शाळेतील कंदी पेढा, लस्सी, तूप, आइसक्रीम, प्रयोगशाळा, पॅकिंग आदी विभागांनाही भेटी दिल्या.

भेटीदरम्यानदुग्धशाळेतील स्वच्छता, नीटनेटकेपणा याबाबत समाधान व्यक्त करत अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कौतूक श्री. केदार यांनी केले. यावेळी श्री. बागडे यांनी संपूर्ण दुग्ध शाळेतील प्रकियेबाबत श्री.केदार यांना सविस्तर माहिती दिली.


Arnica
a medicine without side effect
Homoeopathic Super Speciality Clinic And Research Centre
Mon. to Fri. : Morning - 10:30am to 1:30pm | Evening - 7:30pm to 9:30pm
Sun. : Evening - 6.00pm to 8:00pm | Saturday Closed
CGHC
N-3, Plot No 149, Opp. to N-4 Power House, CIDCO, Aurangabad
Cont: +919422 201 517 |+91 9579797959
E-mail: drpawanhdongre@gmail.com

Dr. Pawan H. Dongre M.D.
Homoeopathic Consultant
Specialist in Chronic Diseases
Dr. Geetanjali P. Dongre M.D.


# दुष्काळात तेरावा महिना! कोरोनाच्या वाढत्या संकटात आता हेल्थ इन्सुरन्स सुद्धा महागणार?


**नवी दिल्ली/प्रतिनिधी**

कोरोनाने सामान्य मध्यमवर्गीय माणसाचं कंबरडं मोडलं आहे आणि आर्थिक परिस्थिती अगदीच बिकट करून टाकली आहे. त्यात आता या मध्यवर्गीय माणसाला आणखी एक आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. भारतात सध्या कोरोना महासाथीची दुसरी लाट आली आहे. त्यामुळे विविध विमा कंपन्यांकडे कोरोनासंबंधी १५ हजार कोटी क्लेम आले आहेत. त्यामुळे भविष्यात कोरोना आजार राहणार हे लक्षात घेऊन विमा कंपन्या आरोग्य विम्याचा प्रीमियम वाढवू शकतात. या कंपन्यांनी त्याबद्दल पावलं उचलायला सुरुवात केली आहे. कोरोनामुळे इन्शुरन्स कंपन्यांकडे आलेले क्लेम मोठ्या प्रमाणात वाढले असूनही कंपन्यांनी प्रीमियम वाढवलेले नाहीत त्यामुळे त्यांच्यावर प्रचंड आर्थिक ताण आहे. विविध विमा कंपन्यांनी एकत्रितपणे विमा नियामककडे आरोग्य विम्याच्या प्रीमियममध्ये १० टक्के वाढ करण्याची मागणी केली आहे. कोविड-१९ महामारी आल्यानंतर कंपन्यांकडे येणाऱ्या क्लेममध्ये प्रचंड वाढ झाली आहे त्यामुळे आरोग्य विम्यामध्ये कोविड १९ सेस म्हणून वाढीव १० टक्के रक्कम आकारण्यास परवानगी द्यावी अशी मागणी या कंपन्यांनी केली आहे.

# कोरोनामुळे यंदाही कुलर उद्योग अडचणीत

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

करोनामुळे सलग दुसऱ्या वर्षी मार्च महिन्यात लॉकडाउनचे संकट आहे. उन्हाळा सुसह्य करण्यासाठी वापरात येणाऱ्या कुलरचे उत्पादन करणारी इंडस्ट्री धोक्यात आली आहे. यंदा तरी कुलरची विक्री होईल या आशेने कच्च्या मालाची भाववाढ होऊनही उत्पादकांनी मोठ्या प्रमाणावर कुलरचे उत्पादन केले, पण लॉकडाउनमुळे दुकाने बंद असल्याने हा माल कंपन्यांमध्ये पडून आहे. राज्य सरकारने या उद्योगाला अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करावे, जेणेकरुन औरंगाबाद परिसरातील हजारो कुटुंबीयांना दिलासा मिळेल, अशी मागणी होत आहे.




औरंगाबाद औद्योगिक वसाहतीत वाळूज, चिकलठाणा, शेंद्रा, बिडकीन तसेच अन्यत्र कूलर उत्पादन करणाऱ्या २२५ हून अधिक कंपन्या आहेत. या कंपन्यांना ३०० छोटे व्यावसायिक कच्चा माल पुरवितात. दरवर्षी कुलर उत्पादन करणाऱ्या उद्योगां मध्ये आठ महिन्यांपासून तयारी सुरु होते. होळीच्या आसपास तयार झालेला माल विक्रीसाठी दुकानांमध्ये पाठविला जातो. गेल्या वर्षी मार्च अखेर लॉकडाउन जाहीर झाला. पुढचे ४० दिवस सर्व व्यवहार बंद होते. त्यामुळे तयार असलेले कुलर कंपन्यांमध्ये, दुकानांमध्ये पडून होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहर व परिसरातून दरवर्षी सव्वालाखच्या आसपास कुलरची विक्री होते. या उद्योगावर १५०० कुटुंबे अवलंबून आहेत. शिवाय छत्तीसगड, बिहारहून ६००० हून अधिक मजूर या उद्योगात कामासाठी आहेत. यंदा फेब्रुवारीमध्ये पुन्हा करोनाने डोके वर काढले आणि या उद्योगांच्या चिंतेत भर पडली. कुलरसाठी तांबे, ॲल्युमिनियम, प्लास्टिकसह अन्य कच्चा माल लागतो. गेल्या वर्षीच्या परिस्थितीमुळे या मालाच्या भावात वाढ झाली. यंदा करोना संकट येणार नाही, कुलरची विक्री होईल, या आशेने कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले, पण यंदाही लॉकडाउन जाहीर झाल्याने हे उद्योग संकटात सापडले आहेत. परराज्यातील मजूर आपापल्या गावी जाण्याची गडबड करत आहेत, पण सरकार पातळीवर काही तरी मार्ग निघेल या आशेने उद्योजकांनी त्यांना थांबवून ठेवले आहे. कच्च्या मालाचे पैसे, ठेकेदार, मजुरांचे पगार थकित आहेत. त्यामुळे कुलर उद्योग संकटात सापडला आहे. राज्य सरकारने याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन या उद्योगांना अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करुन घ्यावे, करोना नियम व अटींचे पालन करुन दररोज विशिष्ट वेळेत विक्रीची परवानगी द्यावी अशी मागणी होत आहे.

## एक देश एक रेशन कार्ड सुविधा जिल्ह्यात उपलब्ध

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

एक देश एक रेशन कार्ड योजनेची सुरुवात २०१८ मध्ये झाली. केंद्र शासनाच्या आयएम-पीडीएस योजनेतंर्गत संबंधित रास्तभाव दुकानात आधार प्रमाणिकरण करुन लाभार्थ्यांला पोर्टेबिलिटीव्दारे देशातील कोणत्याही राज्यातील कोणत्याही रास्तभाव दुकानातून धान्य उचलण्याची सोय उपलब्ध आहे. ती सुविधा औरंगाबाद जिल्ह्यातही सुरू आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी दत्ता भारस्कर यांनी दिली. माहे ऑगस्ट २०१९ मध्ये २ Clusters च्या स्वरुपात महाराष्ट्रात, गुजरात, आंध्रप्रदेश व तेलंगणा या चार राज्यामध्ये एक देश एक रेशनकार्डची अंम लबजावणी प्रायोगिक स्वरुपात करण्यात आली.



GARWARE

**गरवारे पॉलीएस्टर लिमिटेड**

**CIN:** L10889MH1957PLC010889

**नोंदणीकृत कार्यालय :** नायगाव, पोस्ट वाळुज, औरंगाबाद – 431 133.

**कॉर्पोरेट कार्यालय दूरध्वनी :** +91 22 6698 8000, फॅक्स : +91 22 2824 8155.

**ईमेल :** cs@garwarepoly.com, वेबसाइट :www.garwarepoly.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की पुढील व्यक्तींनी / हस्तांतरितींनी हस्तांतरण विलेख 19.02.2019 रोजी दाखल केले होते आणि त्यांचाच पुनर्दाखला 31.03.2021 पूर्वी भाग प्रमाणपत्रा(त्रां)सहित जुन्या हस्तांतरण विलेखासोबत (फॉर्म 7बी) भाग हस्तांतरणासाठी निम्नोल्लेखित यादीनुसार केला होता.

| हस्तांतरकाचे नाव | फोलिओ क्र. | व्यवच्छेदी क्रमांक | | प्रमाणपत्र क्रमांक | भागांची संख्या | हस्तांतरितीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | | |
| प्रह्लादभाई के पटेल | 00P03162 | 4537876 | 4537925 | 51754 | 50 | जयंतीलाल खोदीदास पटेल आणि दिलीपकुमार खोदीदास पटेल संयुक्तपणे |
| जशुमतीबेन जी पटेल | 00J02489 | 3537576 | 3537625 | 28258 | 50 | जयंतीलाल खोदीदास पटेल आणि दिलीपकुमार खोदीदास पटेल संयुक्तपणे |
| गांडालाल परसोत्तमदास पटेल | 00G01619 | 3225026 | 3225075 | 20831 | 50 | जयंतीलाल खोदीदास पटेल आणि दिलीपकुमार खोदीदास पटेल संयुक्तपणे |

6 नोवेंबर 2018 रोजी दिनांकित सेबी परिपत्रकानुसार, खंड 2 (क) अन्वये प्रक्रियेच्या आवश्यकतांचे अनुपालन केल्यास मोठी विजोडता / हस्तांतरकाच्या स्वाक्षऱ्या अनुपलब्ध असताना भौतिक भागांचे हस्तांतरण करता येते. कंपनीला/ तिच्या निबंधकाला आणि हस्तांतरण एजंट (आरटीए) मे. लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी 101, 247 पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – 400083 यांना याबद्दल या प्रकाशनाच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत कोणतीही हरकत मिळाली नाही तर कंपनी उपरोक्त भागांचे हस्तांतरण केवळ डीमॅट स्वरूपात करेल.

**गरवारे पॉलीएस्टर लिमिटेड साठी**
सही /-
अवनीश श्रीवास्तव
कंपनी सचिव

**दिनांक :** 19 एप्रिल 2021
**स्थळ :** मुंबई